महाराष्ट्र शासनाचा २०२४-२०२५ या वर्षाचा

अतिरिक्त अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# श्री. अजित पवार

## उपमुख्यमंत्री (वित्त)

यांनी शुक्रवार, दिनांक २८ जून २०२४ रोजी

केलेले भाषण

भाग - दुसरा

*

**मा. अध्यक्ष महोदय,**

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन माननीय सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसूलाचा सुधारीत अंदाज रुपये तीन लाख सव्वीस हजार तीनशे सत्त्याण्णव कोटी आहे.

२. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात स्वतःच्या कर महसूलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट तीन लाख त्रेचाळीस हजार चाळीस कोटी रुपये एवढे निश्चित करण्यात आले आहे.

**पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करणे**

१. सर्वसामान्य नागरिकांना तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळावा म्हणून राज्यभरात पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित करात समानता आणण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्या वरुन २१ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे. तसेच पेट्रोल वर २६ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे एवढा कर सध्या आहे, आता तो कमी करुन २५ टक्के अधिक प्रति लिटर पाच रुपये बारा पैसे करण्याचा प्रस्ताव आहे.

या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे पासष्ट पैसे व डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये सात पैसे प्रति लिटर स्वस्त होईल.

**पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सुट**

२. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये सात सशस्त्र सेनादल कार्यरत असून त्यापैकी सीमा सुरक्षा दल व केंद्रीय राखीव पोलीस दल यातील सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. आता उर्वरित पाच दलातील म्हणजेच आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारत-तिबेट सीमा पोलीस दल, राष्ट्रीय सुरक्षा रक्षक व सशस्त्र सीमा दलातील राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट देण्याबाबत मी प्रस्तावित करीत आहे.

याचा लाभ अंदाजे बारा हजार जवानांना होईल.

मुद्रांक शुल्क ३. नोंदणी झालेल्या दस्तास कमी मुद्रांक शुल्क भरल्याचे निष्पन्न झाल्यास, मुद्रांक शुल्काच्या फरकाच्या रक्कमेवर दस्त निष्पादित केल्याच्या तारखेपासून आकारण्यात येणारी दंडाची रक्कम दरमहा २% वरुन १% करण्यात येईल.

मुद्रांक शुल्क परतावा ४. मुद्रांक शुल्क परताव्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. अर्ज करण्याची कालमर्यादा मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्याऐवजी एक वर्ष करण्यात येईल.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

मा. अध्यक्ष महोदय, आतापर्यंत दहा वेळा या राज्यातल्या जनतेने मला अर्थसंकल्प मांडण्याची संधी दिली.

**निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी**
**मज हे ही नाही ते ही नाही । वेगळा दोन्हींपासूनी**

या न्यायाने केलेल्या कामाची ही पावती आहे, असे मी मानतो.

**तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा**
**तरी माझ्या दैवा पार नाही.......**

अशी तुकोबारायांच्या भाषेत प्रार्थना करुन मी आपली रजा घेतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**